**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांना यंत्रणा म्हणून मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

शासन निर्णय क्रमांक : मग्रारो २०१२/प्रक्र ६३/रोहयो-१,
नियोजन ( रोहयो ) विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : ८ जानेवारी, २०१३.

वाचा : १) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा, २००५,
२) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम (सुधारित) कायदा, २००६,
३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एफडीएम २०११/प्रक्र.१००/फ-२, दिनांक : ५ ऑक्टोबर, २०११,
४) भारत सरकार, ग्रामीण विकास मंत्रालय, दिल्ली पत्र क्र.जे/११०१९/२/२००८, रोहयो, दिनांक १९ जानेवारी, २००९.
५) महसूल व वन विभागाचे अ.शा.पत्र क्र.प्रस (वने) शिकाना/२०१२/दि.१८.१२.२०१२.

**प्रस्तावना**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम अंतर्गत संपूर्ण राज्यामध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. केंद्र शासनाने ग्रामीण विकास मंत्रालयाच्या दिनांक १९ जानेवारी, २००९ च्या पत्रान्वये नरेगा अंतर्गत घेण्यात येणा-या कामांमध्ये अभिसरण (Convergence) वर भर देण्याबाबत कळविले आहे. तसेच संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांना ग्राम पंचायत सोबत गाव पातळीवर यंत्रणा म्हणून मान्य करण्याच्या सूचना केल्या आहेत.

२. तसेच महसूल व वन विभागाच्या संदर्भाधीन दिनांक ५ ऑक्टोबर, २०११ च्या शासन निर्णय अन्वये महाराष्ट्र राज्यात गाव पातळीवर संयुक्त वन व्यवस्थापन समित्या बॉम्बे व्हिलेज पंचायत अॅक्ट १९५८ मधील कलम ४९ प्रमाणे गठीत झालेल्या आहेत. त्यातील उप कलम ४९ (७) प्रमाणे संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांना ग्रामपंचायत यांना देण्यात आलेली शक्ती, कर्तव्य व जबाबदारी देता येते.

३. तदनुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची कामे करण्याकरिता संयुक्त वन व्यवस्थापन समितीला यंत्रणा म्हणून काम करण्यास मान्यता देण्याची विनंती वन विभागाने संदर्भाधीन दिनांक १०.१२.२०१२ च्या पत्रान्वये केलेली आहे.

उपरोक्त बाबी विचारात घेऊन शासन खालील निर्णय घेत आहे. :-

**शासन निर्णय :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनांतर्गत यंत्रणा म्हणून वन विभाग कार्यरत आहे. वन विभागा अंतर्गत संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांना यंत्रणा म्हणून कामे करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत संयुक्त वन व्यवस्थापन समित्याद्वारे करावयाच्या कामाकरिता तांत्रिक मंजूरी वन विभागाच्या कामांसाठी मान्य मानक व मापदंडाप्रमाणे कामे घेण्याबाबत मान्यता संबंधीत वन परिक्षेत्र अधिकारी / सहायक वन संरक्षक प्रदान करतील. वन विभागासाठी लागू मापदंडाप्रमाणे तहसीलदार कामांना प्रशासकीय मंजूरी देतील.

२) संयुक्त वन व्यवस्थापन समितीची निर्मिती ग्राम सभा करीत असल्यामुळे तसेच समितींच्या कामांवर पंचायतीचे नियंत्रण असल्यामुळे समित्यांनी कामे करतांना ग्रामपंचायत यांच्याशी समन्वय साधून कामे करणे आवश्यक राहील. तसेच प्रत्येक महिन्याला कामासंबंधीचा हिशोब ग्रामपंचायतीला सादर करावा व वेळोवेळी होणा-या ग्रामसभेमध्येही कामाचा अहवाल सादर करावा.

३) संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांद्वारे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची कामे करतांना यंत्रणांसाठी निर्गमित केलेल्या सूचना , मार्गदर्शक तत्वे यांचे पालन करणे अनिवार्य राहील. याबाबत संबंधीत वन परिक्षेत्र अधिकारी यांनी कामांवर नियमित देखरेख ठेवावी व त्रैमासिक अहवालाद्वारे तहसीलदार व उप वन संरक्षक / विभागीय वन अधिकारी यांना त्यांनी केलेल्या तपासणीचा निष्कर्ष नमूद करुन पाठवावा.

४) संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांच्या कामांवरील हजेरी पत्रकांवर हजेरी घेण्याचे काम ग्राम रोजगार सेवक करेल व त्यावर प्रतिस्वाक्षरी सचिव (वन अधिकारी, वरिष्ठ वन रक्षक) करतील.

५) संयुक्त वन व्यवस्थापक समित्यांकडून करुन घेतलेल्या कामांच्या संदर्भात अकुशल मजूरीचे प्रदान तहसीलदार मजूरांना पोस्ट / बँका मार्फत करतील.

६) अर्ध कुशल व कुशल कामाचे प्रदान व्हाऊचरद्वारे तहसीलदार वन विभागास करतील व वन विभाग वन व्यवस्थापन समित्यांना योग्य ते प्रदान करतील.

**२. <u>संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांनी खालील बाबींचा अवलंब करणे आवश्यक राहील.</u>**

१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत कामे करणा-या संयुक्त वन व्यवस्थापन समित्या कार्यरत असल्याची खात्री करण्याची जबाबदारी वन विभागाची राहील.

२) संयुक्त वन व्यवस्थापन समित्या फक्त वन क्षेत्रात कामे करु शकतात.

३) ग्राम पंचायत / ग्राम सभा यांच्या काम निवडीबाबतचा ठराव व शिफारस अनिवार्य राहील. तसेच वार्षिक कृती आराखडा व लेबर बजेट मध्ये कामाचा समावेश असणे आवश्यक आहे.

४) सर्व प्रकारच्या अकुशल कामासाठी जॉब कार्ड आवश्यक आहे.

५) दर पंधरा दिवसांनी मस्टर प्रमाणे मजूरीचे प्रदान करण्यात यावे.

६) कामा संदर्भात MIS वर सर्व प्रकारच्या नोंदी संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांनी वन विभागामार्फत घ्याव्यात.

७) कामांचे सामाजिक अंकेक्षण अनिवार्य असल्याने अकुशल व अर्ध कुशल कामाकरिता सर्व खर्चाची प्रमाणके / पावत्या सामाजिक अंकेक्षणासाठी उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

८) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार हजेरी पत्रक ठेवणे, बँक किंवा पोस्ट ऑफिस

मार्फत मजूरीचे प्रदान करणे इत्यादी कार्यपध्दतीचा अवलंब अनिवार्य राहील.

९) कामे सुरु करण्यापूर्वी , काम सुरु असतांना व काम पूर्ण झाल्यानंतर याप्रमाणे कामाच्या विविध पातळीवर छायाचित्रे काढण्यात यावी व योजनेच्या संकेत स्थळावर (MIS) मध्ये टाकण्यात यावीत.

११) कामाच्या ठिकाणी कामाचे फलक लावण्यात यावेत.

१२) कंत्राटदार / ठेकेदार यांना बंदी राहील.

१३) मजूर विस्थापित करणा-या यंत्रास बंदी राहील.

१४) कामांचे सामाजिक अंकेक्षण स्थानिक मजूरांमार्फत राज्य शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार करणे आवश्यक आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून, त्याचा संगणक संकेतांक (201301081721450916) हा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(व्ही.गिरीराज)
प्रधान सचिव (राहयो)

प्रति,
मा. राज्यपाल यांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव
मुख्य सचिव